सकाळ

# गणेशपूरच्या राजासमोर सायबर सुरक्षेचा जागर

## जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून जनजागृती

■ सकाळ वृत्तसेवा

भंडारा, ता. १५ : सन्मित्र गणेश मंडळाच्या गणेशपूरच्या राजासमोर गणेशोत्सवात शुक्रवार जे. एम. पटेल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम सादर केले.

आज मानव टेक्नॉलॉजीच्या युगात जगत आहे. आपले सर्व दैनंदिन कामे टेक्नॉलॉजीच्या साहाय्याने सुखकर झालेले आहेत. टेक्नॉलॉजिचे अनेक फायदे आहेत. पण, या फायद्यांबरोबरच काही धोकेसुद्धा आहेत. कधीकधी हे धोके मनुष्याचा घात करतात. अशा संभाव्य धोक्यांपासून सर्वांना सावध करण्याच्या उद्देशाने जे. एम. पटेल कॉलेजचे सायबर वॉरिअर जगप्रसिद्ध अँटीव्हायरस कंपनी क्विक हिल फाउंडेशन यांच्यासोबत सायबर सुरक्षेबाबत समाजातील सर्व घटकांना जागृत करीत असतात.

सायबर गुन्हेगारीची समस्या ही आता वैश्विक समस्या झालेली आहे. यावर आळा घालायचा असेल तर, तो फक्त सायबर शिक्षेद्वारे सर्वांना जागृत करूनच शक्य आहे. म्हणून जे. एम. पटेल च्या ३० सायबर योद्धयांनी जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन ४० हजारांपेक्षा जास्त शाळकरी विद्यार्थ्यांना सायबर शिक्षित केले. हे सर्व कार्य जे. एम. पटेल महाविद्यालयाने क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सोबत केलेल्या सामंजस्य कराराअंतर्गत केले आहे.

शुक्रवारी सायंकाळी जे. एम. पटेल महाविद्यालयातील संगणक विभाग, आयक्यूएसी सेल, एनएसएस सेल, एनसीसी युनिट, क्विक हिल फाउंडेशन आणि भंडारा सायबर पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशपूरच्या राजा येथे विविध कार्यक्रमांतून सायबर सुरक्षेसाठी जनजागृती केली.

या सर्व सायबर योद्धयांनी गणेशपूरच्या राजा समोर लेझीम सादर करून कार्यक्रमाची सुरवात केली. त्यानंतर नृत्याविष्काराद्वारे सोशल मीडिया आपल्याला कशाप्रकारे बंदिस्त करतो आणि त्यापासून आपण स्वतःचे संरक्षण कसे करू शकतो हे सर्व नागरिकांना पटवून दिले.

या सायबर योद्धयांनी विविध सायबर गुन्ह्यांबाबत जनसामान्यांना माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. सायबर गुन्हा झालाच तर, त्याची माहिती कशी व कुणाला द्यायची याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी या ३० सायबर योद्धयांनी अशा अनोख्या उपक्रमाद्वारे दोन हजारांपेक्षा अधिक लोकांना सायबर सुरक्षेबाबत जागृत करून समाजापुढे एक आदर्श प्रस्तुत केला. याप्रसंगी सर्व उपस्थितांना सायबर सायबर सुरक्षेची शपथ दिली. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. कार्तिक पन्नीकर, संगणक विभाग प्रमुख डॉ. प्रविण घोसेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सायबर पोलिस स्टेशनचे अधीक्षक शिंदे, हेडकॉन्स्टेबल दिनेंद्र आंबेडारे संगणक विभागाच्या प्रा. डॉ. सबा नसीम, पलाश फेंडेवार, प्रियंका शर्मा, परीना शेख आणि विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात सरपंच विद्या मेहर समुपदेशक सुरेश ठाकरे, सारथी कल्याणकारी संस्थेचे अशोक ढेंगे, महादेव बिसने आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सन्मित्र गणेश मंडळाचे अध्यक्ष रुपेश टांगले, सावन बावणे, पंकज भोगाडे तसेच सर्व पदाधिकारी यांनी सहकार्य केले.


भंडारा : जनजागृती करताना जे. एम. महाविद्यालयाचे विद्यार्थी.